**स.भु.चा शतक महोत्सव | मेळाव्यात कविता, नृत्य, नाट्य, गायन विविध कार्यक्रमांची रेलचेल**

# अनेकींनी उलगडला करिअरचा प्रवास




मेळाव्यात डावीकडून श्रुती तांबे, मैथिली निजामपूरकर, वसुंधरा रसाळ, साधना शहा, चिन्मयी सुर्वे, कृपा तेलंग यांची मुलाखत घेताना उजवीकडून सर्वेषा महाजन. छाया : रवी खंडाळकर

## शतक महोत्सवानिमित्त माजी विद्यार्थिनींचा मेळावा

प्रतिनिधी | **औरंगाबाद**

शाळेतील अनेक आनंदाचे-दुःखाचे क्षण, आयुष्याच्या विविध वळणांवरचा विकास, संस्कारांचा वाटा, शिक्षकांचा सल्ला अशा एक ना अनेक आठवणींना उजाळा मिळाला. सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त माजी विद्यार्थिनींचा मेळावा रविवारी आयोजित करण्यात आला. अनेक जणींनी करिअरचा संघर्षमय प्रवास उलगडून सांगितला.यानिमित्त कविता, नृत्य, नाट्य, गायन अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल होती.

या वेळी विविध पदांवर काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिला आणि गृहिणी म्हणून घरची जबाबदारी सांभाळणाऱ्या मैत्रिणींना एकमेकींना भेटण्याची संधी मिळाली. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या विद्यार्थिनींच्या प्रकट मुलाखती घेत शाळेच्या आठवणी जागवण्यात आल्या. सोबतच करिअर प्रवास कसा झाला याबद्दल जाणून घेण्यात आले. श्रुती तांबे, मैथिली निजामपूरकर, वसुंधरा रसाळ, साधना शहा, चिन्मयी सुर्वे, कृपा तेलंग अशा कर्तृत्ववान महिलांची मुलाखत सर्वेषा महाजन यांनी घेतली. त्यानंतरच्या टप्प्यात ॲड. निशा शिऊरकर, अश्विनी ओक-देशपांडे, सविता वैजापूरकर, प्रतिमा भांड, मोहिनी पानट यांच्या मुलाखती वंदना धनेश्वर यांनी घेतल्या.

### मासिकाचे प्रकाशन

स. भु. मासिकाचे प्रकाशन करण्यात आले. शाळेत आजपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींची मनोगते, आठवणी, कविता लिहिल्या आहेत. भावनांना वाट करून देणारे हे मासिक विशेष ठरले. १९१५ पासून १९४० पर्यंतच्या विद्यार्थिनींचा यामध्ये समावेश होता.

### सांस्कृतिक सादरीकरण

शिक्षिकांनी 'बजे अंगना में शहनाई' गाण्यावर ताल धरला. माजी विद्यार्थिनींनी झुमका गिरा रे, सुहाना सफर यासह विविध गाण्यांचे सादरीकरण केले. 'नगाडे संग ढोल बाजे' आणि 'राधा तेरी चुनरी'या गाण्यांनी भरभरून दाद मिळवली. छम्मा छम्मा, आई भवानी तुझ्या कृपेने अशी बहारदार नृत्ये सादर करण्यात आली. 'शाहीर महाराष्ट्राचा' पोवाडाही सादर करण्यात आला. शिक्षिकांनी हास्यप्रकार सादर केले. अनुराधा देशपांडे यांचे संगीत नाटक सादर केले. विक्रांदच्या कार्यकर्त्या सुनीता आरळीकर यांची या वेळी उपस्थिती होती.

**सामाजिक, राजकीय कार्याची मुहूर्तमेढ रोवली : जयवंतीबेन मेहता**

शारदा मंदिर प्रशालेत झालेल्या विविध संस्कारांतूनच माझ्या सामाजिक आणि राजकीय कार्याची मुहूर्तमेढ रोवली. शाळेतून फक्त शिक्षणच नव्हे तर एक ठोस वैचारिक भूमिका रुजविली गेली, असे विचार माजी मंत्री जयवंतीबेन मेहता यांनी व्यक्त केले.

मेहता म्हणाल्या, आमच्या पिढीवरील संस्कारांमध्ये जितका पालकांचा सहभाग होता, तितकाच शाळांचाही होता. त्या काळात मुला-मुलींची एकत्र शिक्षण ही संकल्पना कुणालाही पटणारी नव्हती. पण मला या शाळेत शिक्षण, मूल्ये शिकायला मिळाली. यातून माझे व्यक्तिमत्त्व घडत गेले.

पुढे समाजात वावरताना आपण कसे वागावे, याचे धडे शाळेतच मिळाले. वैशंपायन बाई आणि दवणे सरांची आठवणही त्यांनी केली. या वेळी कविता सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद मिळाली. सूत्रसंचालन शैलजा धोकटेने केले. न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर, संस्थेचे अध्यक्ष दिनकर बोरीकर, सरचिटणीस ॲड. दिनेश वकील, डॉ. श्रीरंग देशपांडे, रामकृष्ण जोशी यांची उपस्थिती होती.